**महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत कामावरील मजुरांना त्यांच्या हत्याराचे भाडे/धार लावण्याचे दर प्रतिदिन / प्रती हत्यार सुधारीत मजुरीच्या दराच्या अनुषंगाने सुधारण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक मग्रारो-२०१०/प्र.क्र.०४/रोहयो-१.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २२ ऑक्टोंबर, २०१०

**वाचा :**

१) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक:रोहयो-२००३/प्र.क्र.३८/रोहयो-६, दिनांक २६ ऑगस्ट, २००३

२) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक:मजुरी-२००७/प्र.क्र.६३/रोहयो-१, दिनांक २४ एप्रिल, २००७.

३) शासन निर्णय,नियोजन विभाग क्रमांक मजुरी-२००९/प्र.क्र.१११/रोहयो-१, दिनांक ९ नोव्हेंबर, २००९.

**प्रस्तावना:-**

रोजगार हमी योजने अंतर्गत संदर्भिय शासन निर्णय क्र. १ मधील (ब) (६) (क) अन्वये मजुरांना सोयी सवलती पुरविणे अंतर्गत त्यांच्या स्वतःच्या हत्याराचे भाडे रुपये (रु. १/- प्रती मनुष्य दिन) व धार लावण्याचा खर्च (रु. १/- प्रती मनुष्य दिन) देण्यात येत होते.

२. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५ अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मजुरांच्या मजुरीचे दर सन २००७ ते २००९ पर्यंत संदर्भिय शासन निर्णय क्रमांक २ व ३ अन्वये अनुक्रमे ४५% व ५५ % असे दोन वेळा सुधारण्यात आले. त्या अनुषंगाने सद्य:स्थितीत मजुरांना सोयी सवलती पुरविण्या अंतर्गत त्यांच्या स्वतःच्या हत्याराचे भाडे रुपये १/- प्रती मनुष्य दिन व धार लावण्याचा खर्च रुपये १/- प्रती मनुष्य दिन कमी आहेत. या विषयी तांत्रिक समितीने सदर दर रुपये १/- ऐवजी रुपये २/- वाढविण्याची शिफारस केली आहे. त्या अनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

**शासन निर्णय :-**

राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांना सोयी सवलती पुरविणे अंतर्गत त्यांच्या स्वतःच्या हत्याराचे भाडे रुपये २/- प्रती मनुष्यदिन व त्या हत्यारांना धार लावण्याचा खर्च रुपये २/- प्रती मनुष्यदिन देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. या प्रित्यर्थ येणारा खर्च राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ च्या मार्गदर्शक सूचना २००८ च्या तिस-या आवृत्तीतील परिच्छेद ६.२ अन्वये कुशल / साधन सामुग्री यासाठी तरतूद करण्यात येणा-या निधीतून भागविण्यात यावा.

३. हे आदेश जिल्हाधिकारी यांनी संबंधित यंत्रणा, अधिका-यांच्या व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या अधिका-यांच्या निदर्शनास आणावे आणि त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी

२/-

होईल हे सुध्दा पहावे. या प्रित्यर्थ होणारा खर्च मजुरांच्या सोई सवलतीवर होणा-या खर्चाच्या टक्केवारीत धरण्यात येऊ नये/समाविष्ट करण्यात येऊ नये.

४. हे आदेश शासन निर्णयांच्या दिनांकापासून लागू राहतील.

५. सदर आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४०४/१०/व्यय-८ दिनांक ४ ऑक्टोबर, २०१० च्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

६. शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in वेबसाइटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१०१०२६११३०२५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( ज.भि. पवार. )**
**कार्यासन अधिकारी (रोहयो), नियोजन विभाग.**

प्रत,

१. राज्यपालाचे सचिव
२. मुख्यमंत्र्यांचे सचिव.
३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
५. सर्व अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई
६. सर्व विभागीय आयुक्त.
७. सर्व जिल्हाधिकारी (बृहन्मुंबई वगळून)
८. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
९. उपसचिव,महाराष्ट्र विधानमंडळ (रोहयो समिती) ४० प्रती.
१०. प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
११. आयुक्त (कृषी) कृषी आयुक्तालय, पुणे.
१२. संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,महाराष्ट्र राज्य,पुणे.
१३. संचालक,फलोत्पादन, कृषी आयुक्तालय, पुणे
१४. संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे.
१५. सर्व मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग (जलसंपदा विभाग)
१६. सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
१७. मुख्य अभियंता (स्था. स्तर), लघु पाटबंधारे, पुणे-६
१८. सर्व जिल्हा अधिक्षक/ कृषी अधिकारी
१९. सर्व मंत्रालयीन विभाग (विधी व न्याय विभाग वगळून)
२०. सर्व उपसचिव (रोहयो),नियोजन विभाग,मंत्राय, मुंबई.
२१. नियोजन विभागातील सर्व अवर सचिव व कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग).
२२. निवड नस्ती(रोहयो-१)/सारसंग्रह रोहयो-१.